D/2016-17/BP 471

औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

" बां ध का मा चा प र वा ना "

COMMENCEMENT CERTIFICATE

सुधारित बांधकाम परवानगी

परवाना क्रमांक :- 1010 /२०१७-१८

अर्जाईल क्रमांक :- १६७/१७/२०१७-१८

दिनांक :- 12/03/२०१८

परवाना धारण करण्यांचे नाव :- श्री. गोपीकिसन ओमकारदास बियाणी व इतर पाच तर्फे जी.पी.ए.धारक श्री. अशोक पिता जयनारायण बाहेती.

गट क्रमांक :- ६९ मौजे :- सातारा औरंगाबाद

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २५३ व महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ४५ अन्वये व तत्संबंधित नियमास अनुसरुन खालीलप्रमाणे बांधकामाची/दुरुस्तीची परवानगी दिली जाते. सदरील परवान्याचा अंमल आज तारखे पासुन एक वर्षापर्यंत राहील. बांधकाम पूर्ण झाल्यायावत लेखी माहिती तपासणीसाठी या कार्यालयात पाठविण्यात यावी. नगर रचनाकार यांनी लाल रंगाने दुरुस्ती/ मान्य केलेल्या नकाशा प्रमाणे बांधकामाची परवानगी खालील अटींवर दिली जाते.

०१. सदर बांधकाम परवाना हा विकास परवानगीच्या अनुबंगाने दिला जात आहे. यामध्ये नमुद केलेल्या भूखंडा संबंधी भविष्यात कोणाचे मालकी हक्क, इजमेंट हक्क, अगर इतर कोणत्याही हित संबंधात बाधा निर्माण होत असतील तर त्यांनी आपल्या तक्रारी / वाद न्यायालयामार्फत परस्पर दुर करुन घ्याव्यात या संबंधाने उद्‌भवणाऱ्या कोणत्याही बाबींची जबाबदारी औरंगाबाद महानगरपालिकेवर राहणार नाही.

०२. शेजाऱ्याच्या कोणत्याही प्रकारच्या हक्कास बाधा निर्माण होईल असे बांधकाम करण्यात येवू नये.

०३. प्रत्यक्ष बांधकाम सुरु करण्यापूर्वी नगर भूमापन अधिकारी/ तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांच्यामार्फत भूखंड आखणी करुन घेणे अर्जदार व वास्तुविशारद यांच्यावर बंधनकारक राहील.

०४. बांधकाम साहित्य व माती महानगरपालिकेच्या रस्त्यावर ठेऊ नये. याबाबत दिनांक २२/०२/२०१८ रोजी संधिके सोबत दिलेले हमीपत्र अर्जदारास बंधनकारक राहील.

०५. सदर भूखंडास/ मिळकतीस मा. जिल्हाधिकारी यांचे मार्फत म.ज.म.अधि.१९६६ चे कलम ४४ अन्वये अकृषिक वापराचा आदेश/ परवाना व अकृषी सारा अदयावत भरणा पावती ६० दिवसांच्या आत प्राप्त करुन या कार्यालयात दाखल करावा.

०६. या कार्यालयाचे संबंधीत अधिकारी जागेवर प्रत्यक्ष पाहणीसाठी आले असता त्यांचे अवलोकनार्थ मंजुरीचे संबंधीत कागदपत्रे दाखविण्यात यावे.

०७. जोत्यापर्यंत (Plinth Level) चे बांधकाम झाल्यानंतर सदरहु कार्यालयास त्याप्रमाणे अधिकृत वास्तुविशारदच्या प्रमाणपत्रासह कळवावे व Plinth Level Completion प्रमाणपत्र कार्यालयातर्फ घेणे आवश्यक आहे.

०८. मंजुर बांधकाम नकाशाच्या विरुध्द जर बांधकाम करण्यात आले तर आपणा विरुध्द महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-४३ रुह ५२, कलम-५४, कलम-५३ प्रमाणे पूढील कार्यवाही करण्यात येईल.

०९. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २६३ अन्वये बांधकाम पूर्ण झाल्यानंतर भोगवटा प्रमाणपत्र (Occupancy Certificate) घेण्यात यावे व त्यानंतरच इमारतींचा वापर सुरु करावा नसता आपल्या विरुध्द म.प्रा.नि.व न.र. अधि.१९६६ चे कलम-५३ अन्वये पूढील कार्यवाही करण्यात येईल.

१०. भोगवटा प्रमाणपत्र घेतेवेळी महानगरपालिका परवानाधारक प्लंबरचे जलनिःसारण जोडणी बाबतचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

११. छतावर पडणाऱ्या पावसाचे पाणी संकलीत करुन विंधन विहीर असल्यास त्यांचे पुर्नभरण करावे. जेथे विंधन विहीर नाही अशा ठिकाणी सोकपीट (शोषकूप) तयार करुन त्यामध्ये त्याचा निचरा करावा.

१२. या पुर्वीच्या बांधकाम परवानगी वेळी (बा.प.क्र. ६२८/२०१५-१६) शहर विकास निधी रक्कम रु. २८,१५,०००/- च.क्र. २५७०१ दिनांक ३१/०७/२०१५ रोजी व शहर विकास निधीवर व्याज रक्कम रु. रु. ४२,३००/- च.क्र. २६५३८ दिनांक ३१/०७/२०१५ रोजी भरणा केला आहे. आता शहर विकास निधीवर व्याज रक्कम रु. रु. २४,६९,२००/- च.क्र. ६३४३ दिनांक २२/०२/२०१८ रोजी भरणा केला आहे.

१३. या पुर्वीच्या बांधकाम परवानगी वेळी (बा.प.क्र. ६२८/२०१५-१६) जमीन विकास शुल्क रक्कम रु. २०,१०,०००/- च.क्र. २५७०२ दिनांक ३१/०७/२०१५ रोजी व जमी विकास शुल्कावर व्याज रक्कम रु. ३०,१५०/- च.क्र. २६५३९ दिनांक ३१/०७/२०१५ जमा केली आहे.

१४. या पुर्वीच्या बांधकाम परवानगी वेळी (बा.प.क्र. ६२८/२०१५-१६) स्वंयम विकास अनामत रक्कम रु. २,००,०००/- च.क्र. १९१९२ दि. १३/०६/२०१४ रोजी जमा केली आहे.

१५. या पुर्वीच्या बांधकाम परवानगी वेळी (बा.प.क्र. ६२८/२०१५-१६) Enclosed Balcony रक्कम रु. २६,८७,१००/- च.क्र. २६५३७ दिनांक ३१/०७/२०१५ रोजी जमा केली आहे

१६. भोगवटा प्रमाणपत्र घेणे पूर्वी सामासातील अंतरामध्ये कमीत कमी (१४०) झाडे लावून त्यांचे संगोपन करावे.

१७ जागेवरील झाडे तोडावयाची झाल्यास प्रथम सक्षम प्राधिकरणा मार्फत परवानगी घेण्यात यावी.

१८. जागेवर विद्युत वाहिनी असल्यास ती प्रत्यक्ष बांधकाम सुरु करण्यापूर्वी संबंधीत खात्याकडून काढुन-घ्यावी, नंतरच बांधकाम सुरु करावे.

१९. अंतर्गत विकासाच्या कामा बाबत (Self Development) आदेश क्रमांक जा.क्र./मनपा/नरवि/ससंनर/ २०१७/९३९ दिनांक २९/०४/२०१७ चा आदेश अर्जदार यांच्यावर बंधनकारक राहील.

२०. सदरील योजने (Scheme) मधील सर्व रस्ते, पाणी पुरवठा, जलनिसा:रण, विद्युत, दिवा बत्ती इत्यादी सर्व सोई सुविधांची देखभाल दुरुस्तीची कायम स्वरुपी जबाबदारी विकासक तथा या योजनेतील सर्व गाळेधारक यांची राहील.

२१. सदर भूखंडा संबंधी कोणाच्या मालकी हक्क, इंजमेंट हक्क आगत इतर कोणतेही हितसंबंध बाधीत / निर्माण होत असतील तर त्यांनी आपल्या तक्रारी / वाद सा. न्यायालयामार्फत परस्पर दुर करुन घ्याव्यात. या संबंधाने उद्‌भवणाऱ्या कोणत्याही बाबींची जबाबदारी औरंगाबाद महानगरपालिकेवर राहणार नाही. या बाबत अर्जदार स्वत: सर्वस्वी जबाबदार राहतील.

२२. अंतर्गत विकासाची कामे करावयाची कामे.

२३ अंतर्गत रस्ते खडीकरण व डांबरीकरण अथवा कॉक्रेटीकरण करणे. (यात गृह निर्माण योजनेतुन जाणाऱ्या विकास योजना रस्त्याचा त्याचा मालकी हक्क मर्यादेपर्यंत विकास करण्याचा समावेश राहील.)

Seal of the Sub-Registrar दुय्यम निबंधक औरंगाबाद क्र.६, यांची मुद्रा Aurangabad

अ ना ना - ६

Scanned by CamScanner

२०१८

(२) जलनि:सारण व जलवाहिनी टाकणे. (३) विद्युत खांबांसह विद्युत दिवे लावणे. (४) आवश्यकता असल्यास वाला ट्रेनिंगसाठी रिटेनिंग वॉल बांधणे. (५) जलनि:सारणाची महानगरपालिकेच्या जलनि:सारण वाहिनीरा जोडणी होईपर्यंत सार्वजनिक एकत्रित स्वरुपात या आवश्यता असल्यास वैयक्तिक स्वरुपात आवश्यक त्या ठामसेप्टा Septic Tank बांधणे, Waste Water Treatment Plant बांधणे, व Operate व Maintenance करणे.
(६) पाणी पुरवठा (जलवाहीनी) ची कामे करणे.(७) रस्त्यालगत गटाराची व्यवस्था करणे.
(८) खुल्या जागेचा सर्वांगीण विकास करणे.(०९) प्रस्तावित इमारतीसाठी प्रोव्ह रस्त्याचा सर्वांगीण विकास करणे.
वर नमुद अंतर्गत विकासाची कामे महानगरपालिकेच्या संबंधित विभागाच्या मंजुरीने व पूर्व परवानगीने महानगरपालिकेच्या मानांकना नूसार संबंधित विभागाच्या देखरेखीखाली पूर्ण करुन त्या बाबत पूर्णत्वाचे प्रमाणपत्र भोगवटा प्रमाणपत्र घेवी अथवा एक वर्षाच्या कालावधीत सादर करावीत. या बाबत दिनांक २२/०२/२०१८ रोजी दिलेले नोटरीकृत हमीपत्र अर्जदार यांच्यावर बंधनकारक राहील. (नोटरी श्री. सय्यद एस. अली)

२३. महाराष्ट्र मालकी हक्काचा (बांधकामाचे प्रवर्तन, व्यवस्थापन आणि हस्तांतरण यांचे नियमन) अधिनियम १९६९ चे कलम ३ मधील दैण्यात आलेल्या जबाबदाऱ्याचे पालन करणे विकासकावर बंधनकारक राहील. तसेच कलम-१० नुसार सहकारी संस्था नोंदविण्यासाठी आवश्यक सभासद संख्या झाल्यानंतर विकासकाने चार महिण्याच्या आत संस्थेची नोंदणी करणे विकासकावर बंधनकारक राहील.

२४. महाराष्ट्र मालकी हक्काच्या फ्लॅट अधिनियम १९६३ चे कलम-११ नुसार विकासकाने सहकारी संस्था किंवा लिमीटेड कंपनी स्थापन केल्यानंतर इमारत बांधलेल्या जमीनीचे हक्क हितसंबंध संस्था नोंदविल्यापासून चार महिण्याच्या आत संस्थेस हस्तांतरीत करणे विकासकावर बंधनकारक राहील.

२५. बांधकाम परवानगी आदेशामधील सर्व अटींची माहिती गाळेधारक, फ्लॅट धारकांना देणे विकासकावर बंधनकारक राहील.

२६. अंतर्गत विकासाची कामे अर्जदार स्वत: करणार आहेत. अंतर्गत विकास कामासाठी महानगरपालिका कोणताही खर्च करणार नाही. तसेच अर्जदार/ संस्था कोणत्याही नागरी सुविधाची मागणी महानगरपालिकेकडे करणार नाही. अंतर्गत विकास कामा बाबत नोटरीकृत शपथपत्र / करारनामा दिलेला आहे. सदर शपथपत्र अर्जदारावर बंधनकारक राहील.

२७. अंतर्गत विकासाच्या कामाची कायमस्वरुपी देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी अर्जदारावर राहील.

२८. जोत्याचे प्रमाणपत्र घेण्यापूर्वी सर्व इमारती सक्षम कार्यालया मार्फत मोजणी नकाशावर बसवून तसा मोजणी नकाशा या कार्यालयात सादर करावा.

२९. सदर जागेच्या मालकी हक्का बाबत, जागेच्या हद्दी बाबत, चतु:सिमे बाबत वाद उद्‌भवल्यास त्यास अर्जदार स्वत: सर्वस्वी जबाबदार राहील. या बाबत महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. अर्जदाराने या बाबतचे वाद परस्पर मा. न्यायालयामार्फत सोडवावा.

३०. प्रत्यक्ष बांधकाम सुरु करण्यापूर्वी सदर जागेच्या चतु:सिमा, हद्दी सक्षम कार्यालयाकडून मोजणी करुन घ्याव्यात.

३१. ३०.०० मीटर रुंद विकास योजना रस्त्याने, गट क्रमांक २०/पैकी मौजे नक्षत्रवाडी औरंगाबाद येथे Folio No. 21 TDR CERTIFICATE No. AMC/TP/DRC/D/11/2012 Date 24/01/2012 अन्वये तयार झालेल्या टि.डी.आर क्षेत्रापैकी ३३४५.०० चौ.मी. व २४.०० मीटर रुंद विकास योजना रस्त्याने, गट क्रमांक ८९/पैकी, ९०/पैकी, व ९१/पैकी मौजे मिटमिटा, औरंगाबाद येथे Folio No. 64 TDR CERTIFICATE No. AMC/TP/DRC/E/41 /2012 Date 04/06/2012 अन्वये तयार झालेल्या टि.डी.आर क्षेत्रापैकी ३६२३.२० चौ.मी. असे एकूण ६९६८.२० चौ.मी. क्षेत्र सदर मिळकतीवर वापरण्यात आलेले आहे.

३२. सदर प्रकरणी अग्निशमन अधिकारी यांचे प्रोव्हीजनल अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र Out Word No. AMC/FIRE/264/2017 Date 19/05/2017 अन्वये प्राप्त असून त्यामधील अटी अर्जदार यांच्यावर कायम स्वरुपी बंधनकारक राहतील. भोगवटा प्रमाणपत्र घेते वेळी अग्निशमन अधिकारी यांचे फयनल अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील.

३३. विकास नियंत्रण नियमावलीनुसार Waste Water Recycling, &, Rain Water Harvesting करीताची अंमलबजावणी करणे अर्जदारास बंधनकारक राहील.

३४. आवश्यकतेनुसार महाराष्ट्र प्रदुषन नियत्रण मंडळ, औरंगाबाद यांचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे (Environmental Clearance) अर्जदारास बंधनकारक राहील.

३५. सद्यस्थितीत महानगरपालिकेस पाणी पुरवठा करणे शक्य नाही. जेव्हा महानगरपालिकेकडे अतिरीक्त पाणी उपलब्ध होईल त्यावेळी सदरास पाणी पुरवठा करणे शक्य होईल, तरी पाणी पुरवठा बाबत अर्जदारास आग्रह धरता येणार नाही.

प्रशासकीय तजविज दि. २२/०२/२०१८)

९५६	४९	९२०

२०१८

आयुक्त, ८.३.१४
औरंगाबाद महानगरपालिका,
यांचे करीता.
O. C. Signed by A.B.T.

प्रतिलिपी:-
०१. मा. अधिक्षकीय अधिकारी, औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.
०२. प्रशासकीय अधिकारी विभाग क्रमांक ---------- यांना माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव.

सूचना

जमीनीचे अनाधिकृत प्लॉटींग/तुंडेवारी करणे /विना परवानगी बांधकाम करणे, मंजूर परवानगीचे विरोधात बांधकाम करणे . भोगवटा प्रमाणपत्र घेतल्याविना इमारतीचा वापर करणे, परवानगी विना जमीनीचा/इमारतीचा वापर बदलणे. मंजूर परवानगी आदेशातील अटी शर्तींचे उल्लंघन करणे, इत्यादी बाबी या महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम ,१९६६ चे कलम ५२,५३,५४, च्या तरतुदीनुसार अजामीनपात्र वरवरपात्र गुन्हा (Nonbailable Cognizable Offence) ठरविण्यात आले असून अपराध सिध्द झाल्यानंतर (After Conviction) संबंधीत जमीन मालक , विकासक, गुत्तेदार, अभिकर्ता, भोगवटादार या पैकी जे कोण संबंधीत असतील त्यांना एक महीना ते तीन वर्षे पर्यंत कैद किंवा रुपये २०००/- ते रुपये ५०००/- पर्यंत दंड किंवा दोन्ही या प्रमाणे शिक्षेची तरतुद आहे .

०२. वरील प्रकरणच्या अनाधिकृत विकासाबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम ,१९६६ चे कलम - ५२, ५३, ५४ नुसार औरंगाबाद महानगरपालिका द्वारा कोणतीही संबंधीत जमीन मालक, विकासक, गुत्तेदार , अभिकर्ता, भोगवटा धारक, यांचे विरोधात संबंधीत पोलिस स्टेशन कडे लेखी फिर्याद दाखल करु शकते. (महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील शासकीय परिपत्रक क्रमांक टी. पी.बी. ४३८३ /१६५९/यु.डी.- ५ दि. १५ जुन १९८३).

०३. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ५३ (१) नुसार वरील अनुक्रमांक १ मध्ये नमुद अनाधिकृत विकास हे कायमस्वरुपी अनाधिकृत विकास ठरविण्यात आले असुन कितीही वर्षा नंतर तो उघडकिस आल्यावर त्यांचे विरोधात औरंगाबाद महानगरपालिका किंवा इतर संबंधित शासकीय/ निमशासकीय संस्था किंवा खाजगी व्यक्ती वरील अनाधिकृत विकासाचे संबंधित जमिन मालक, विकासक, गुत्तेदार, अभिकर्ता, भोगवटादार जे जे कोण संबंधित असतील त्यांचे विरुध्द पोलिस स्टेशनकडे लेखी फिर्याद दाखल करु शकते .